**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ / १५६२ / २०२६ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| प्रशांत विष्णुकांत कामाजी | सह दुय्यम निबंधक, वर्ग-२, हवेली क्र. २, जि. पुणे | सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे |

**( सुनावणी दिनांक - १७ / ०८ / २०२६ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २३.०४.२०२६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा संक्षिप्त तपशील |
|---|---|
| २४.११.२०२५ | बक्षीसपत्र ४४२० (२५ जुन १९८२) चे मुळप्रत / दस्तऐवज. तसेच मुळ प्रत मिळत नसेल तर मुळ प्रत मिळवण्यासाठी माहिती व प्रोसिजर ची माहिती. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, " जन माहिती अधिकारी यांनी माहिती आढळ होत नसल्याबाबत कळविले आहे. "

जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, " अपिलार्थी यांनी माहिती अर्जात जवळपास ४२ वर्षापूर्वीच्या माहितीची मागणी केली आहे. अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०८.१२.२०२५ रोजीच्या पत्राने उत्तर देवून कार्यालयातील अभिलेख कक्षात माहितीचा शोध घेतला असता सदर दस्ताचा अद्याप आढळ झालेला नाही, याबाबत कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि. २९.०१.२०२६ रोजी कार्यालयाच्या अभिलेखात दस्तांचा कसोशीने शोध घेवून ४ आठवड्यात दस्त उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय पारित केला आहे. "

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जात जवळपास ४२ वर्षापूर्वीच्या माहितीची मागणी केली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०८.१२.२०२५ रोजीच्या पत्राने उत्तर देवून कार्यालयातील अभिलेख कक्षात माहितीचा शोध घेतला असता सदर दस्ताचा

अद्याप आढळ झालेला नाही, याबाबत कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन दि. २९.०१.२०२६ रोजी कार्यालयाच्या अभिलेखात दस्तांचा कसोशीने शोध घेवून ४ आठवड्यात दस्त उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय पारित केला आहे. प्रथम अपिलीय आदेशानंतर जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थी यांना अद्यापही माहितीचे प्रदान झाले नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार सह जिल्हा निबंधक (वर्ग-१) तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे यांना याप्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने माहितीचा शोध घेण्याकरिता विशेष पथक नेमण्यात यावे. सदर विशेष पथकाद्वारे शोध घेऊन उपलब्ध झालेली माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार नोंदणीकृत डाकेने विनामुल्य उपलब्ध करून द्यावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र. १५६२ / २०२६ / पुणे 4071/2026 दिनांक - 7/9/2026